महाराष्ट्र शासन
# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद
पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद - ४३१ ००५
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
Email Id: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

जा.क्र.:विकाऔ/भांडार/२०२३/ 3130 दिनांक 26 JUL 2023

**स्मरणपत्र-१**
**ई-मेलद्वारे**
**अतितात्काळ**

प्रति,
**प्राचार्य,**
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित /
पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था
उपसचिव, म.रा.तं.मं.प्रा.का.औबाद
**औरंगाबाद विभाग**

**विषयः-** **शासकीय, निमशासकीय, खाजगी कार्यालये व कार्यालयांचा परिसर तबाखूमुक्त करण्याबाबत**

संदर्भः- १. सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रमांक :तंनिका-२१२३/प्र.क्र.८१/आरोग्य५, दिनांक १० जुलै, २०२३
२. या कार्यालयाचे पत्र क्र.विकाऔ/भांडार/२०२३/२९२८, दिनांक ११.०७.२०२३

तंबाखू व तंबाखुजन्य पदार्थ प्रतिबंध कायदा-२००३ च्या कलम-४ प्रमाणे शासकीय, निमशासकीय, खाजगी कार्यालये, उपहारगृहे व कार्यालयाचा परिसर इत्यादी सार्वजनिक ठिकाणी तंबाखू व तंबाखुजन्य पदार्थांचे सेवन तथा धुम्रपान करणे व थुंकणे हे प्रतिबंधित करण्यात आले आहे.

सदरील कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी करिता संदर्भिय क्र.१ च्या शासन निर्णयान्वये केलेल्या मागदर्शक सूचनांची संपूर्ण राज्यभर प्रभावी अंमलबजवणी करणे हेतू संबंधित विभागाने त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व यंत्रणांना कार्यवाही करावयाच्या सूचना/दक्षता देण्यास निर्देशित करण्याबाबतच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.

त्यानुषंगाने, संदर्भिय शासन निर्णयाचे अवलोकन करुन त्यामध्ये दिलेल्या सुचनांप्रमाणे आपल्या कार्यालयात / संस्थेत त्वरीत कार्यवाही करावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल २६/०७/२०२३ रोजी पर्यंत या कार्यालयास ई-मेलव्दारे सादर करावा, असे आापणांस संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते.

तथापि, अद्यापपर्यंत संस्थांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर केलेला नाही. ज्या संस्थांनी अहवाल सादर केला आहे त्यांनी पुन्हा माहिति पाठवू नये.

(उमेश नागदेवे)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

\\Dataserver\Kumavatsir\Bhandar\Circular.Docx\७५

महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद - ४३१ ००५

दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९

Email Id: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

जा.क्र.:विकाऔ/भांडार/२०२३/ 2928 दिनांक : 11 JUL 2023

**ई-मेलद्वारे**

**अतितात्काळ**

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित /

पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था

**औरंगाबाद विभाग**

उपसचिव, म.रा.तं.शि.म.प्रा.का. औबाद

**विषयः-** **शासकीय, निमशासकीय, खाजगी कार्यालये व कार्यालयांचा परिसर तंबाखूमुक्त करण्याबाबत**

संदर्भः- सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रमांक :तंनिका-२१२३/प्र.क्र.८१/आरोग्य५, दिनांक १० जुलै, २०२३

तंबाखू व तंबाखुजन्य पदार्थ प्रतिबंध कायदा-२००३ च्या कलम-४ प्रमाणे शासकीय, निमशासकीय, खाजगी कार्यालये, उपहारगृहे व कार्यालयाचा परिसर इत्यादी सार्वजनिक ठिकाणी तंबाखू व तंबाखुजन्य पदार्थांचे सेवन तथा धुम्रपान करणे व थुंकणे हे प्रतिबंधित करण्यात आले आहे.

सदरील कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी करिता संदर्भिय शासन निर्णयान्वये केलेल्या मागदर्शक सूचनांची संपूर्ण राज्यभर प्रभावी अंमलबजवणी करणे हेतू संबंधित विभागाने त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व यंत्रणांना कार्यवाही करावयाच्या सूचना/दक्षता देण्यास निर्देशित करण्याबाबतच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.

त्यानुषंगाने, संदर्भिय शासन निर्णयाचे अवलोकन करुन त्यामध्ये दिलेल्या सुचनांप्रमाणे आपल्या कार्यालयात / संस्थेत त्वरीत कार्यवाही करावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल २६/०७/२०२३ रोजी पर्यंत या कार्यालयास ई-मेलव्दारे सादर करावा.

सोबत - संदर्भिय शासन निर्णय.

(उमेश नागदेवे)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

\\Dataserver\Kumavatsir\Bhandar\Circular.Docx\७४

**शासकीय, निमशासकीय, खाजगी कार्यालये व कार्यालयांचा परिसर तंबाखूमुक्त करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: तंनिका-२१२३/प्र.क्र.८१ /आरोग्य ५**
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार,
संकुल इमारत, मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
तारीख: १० जुलै,२०२३

**वाचा :**

**१) केंद्र शासनाचे " सिगारेट व इतर तंबाखुजन्य पदार्थ (व्यापार व वाणिज्य, उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे निषेध ) अधिनियम, २००३" (कोटपा कायदा-२००३)**

**२) आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांनी राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमासंदर्भात निर्गमित केलेली मार्गदर्शक तत्व (Operational Guidelines) २०१५**

**३) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. तंबाखू-२०१३/प्र.क्र.२५३/आ-५ दिनांक २ एप्रिल, २०१६**

**४) केंद्र शासनाचे परिपत्रक क्र. F. No. १६०१२/०६ /२०१७ TC दिनांक ०८.११.२०१७**

**५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय नियंत्रण समितीची बैठक दिनांक ३०.०९.२०२२ रोजीचे इतिवृत्त**

**प्रस्तावना :**

धूम्रपान आणि तंबाखूच्या सेवनापासून तरुणांना/युवापिढीला आणि जनसामान्यांना दूर ठेवण्याकरीता केंद्र शासनाने सिगारेट आणि तंबाखूजन्य उत्पादने (जाहिरात, प्रतिबंध व व्यापार, वाणिज्य, उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे नियमन) कायदा २००३ (कोटपा कायदा-२००३) तयार केला आहे.

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण तसेच कोटपा कायदा २००३ च्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याकरिता मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय नियंत्रण समितीची बैठक दिनांक ३०.०९.२०२२ रोजी घेण्यात आली होती.

तंबाखू व तंबाखुजन्य पदार्थ प्रतिबंध कायदा-२००३ च्या कलम-४ प्रमाणे शासकीय, निमशासकीय, खाजगी कार्यालये, उपहारगृहे व कार्यालयाचा परिसर इत्यादी सार्वजनिक ठिकाणी तंबाखू व तंबाखुजन्य पदार्थांचे सेवन तथा धूम्रपान करणे व थुंकणे हे प्रतिबंधित करण्यात आले आहे. सदर बैठकीत याबाबत संपूर्ण राज्यभर प्रभावी अंमलबजावणी व्हावी अशी सूचना केलेली आहे. सदर सुचनेच्या अनुषंगाने शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाच्या सेवनामुळे/धुम्रपान यामुळे मानवी शरीरावर दुष्परिणाम होतात. असंसर्गजन्य रोगांमधील कर्करोग, हृदयविकार, मानवी हृदयाशी निगडित रोग, फुफुसांचा कर्करोग

यासारखे गंभीर आजार होतात. भारतामध्ये दरवर्षी होणाऱ्या मृत्यूंमध्ये ८-९ लाख मृत्यू हे तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन केल्यामुळे होत असतात. सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान केल्यामुळे आणि थुंकल्यामुळे त्या मधून स्वाईन फ्लू, क्षयरोग, निमोनिया आणि पोटाचे विकार इत्यादी संसर्गजन्य आजार पसरतात.

२. जन सामान्यांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून आणि शासकीय इमारती स्वच्छ राहण्यासाठी "स्वच्छ भारत स्वस्थ भारत" मोहिमेद्वारे शासकीय इमारतीची साफसफाई करून शासकीय कार्यालये व परिसर हा " तंबाखू मुक्त परिसर" म्हणून जाहीर केला आहे, त्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

३. सार्वजनिक ठिकाणी ज्यामध्ये शासकीय, निमशासकीय कार्यालये, खाजगी कार्यालये, शासकीय संस्था, कार्यालयातील कामाची जागा, उपाहारगृहे, शाळा व महाविद्यालये यांचा समावेश होतो तेथे नागरिकांच्या संरक्षणाकरीता सिगारेट, तंबाखू व तंबाखूजन्य इतर उत्पादने प्रतिबंधक कायदा २००३ च्या कलम -४ अन्वये तंबाखू खाणे /थुंकणे/ धूम्रपान करण्यास प्रतिबंध आहे. शासकीय इमारतीच्या परिसरामध्ये धूम्रपान आणि थुंकणे हा दंडात्मक गुन्हा आहे, त्यानुसार कारवाई करावी.

४. भारतीय दंड संहितेच्या कलम - २६८ मध्ये अंतर्भूत केल्याप्रमाणे जिच्यामुळे जनतेला अथवा आजूबाजूस राहणाऱ्यांना अथवा ज्यांची मालमत्ता, वहिवाट आहे, अश्या सरसकट सर्व लोकांना नुकसान, अटकाव, धोका किंवा त्रास होतो, अशी कोणतीही कृती करणारी व्यक्ती सार्वजनिक उपद्रवाबद्दल दोषी राहील, असे गृहीत धरुन कारवाई करावी.

५. शासकीय कार्यालये व परिसर हा " तंबाखू मुक्त परिसर" म्हणून करावयाची कार्यवाही पुढील प्रमाणे राहील:-

अ. शासकीय इमारतीची साफसफाई नियमित करण्यात यावी तसेच तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाच्या निषेधार्थ शासकीय इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ चित्र क्र. १ मध्ये दर्शविल्यानुसार फलक लावण्यात यावा त्याचे आकारमान हे १२० से. मी. x ६० से. मी. एवढे असावे.

ब. शासकीय ईमारतीच्या मुख्यद्वार/इतर द्वार जिथून ईमारतीमध्ये प्रवेश होतो तसेच प्रत्येक मजल्यावर लिफ्ट शेजारी आणि विविध भागांमध्ये पुढील तरतुदीसह तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाच्या निषेधार्थ फलक प्रदर्शित करावेत. फलक हा कमीत कमी ६० से. मी. x ३० से.मी. असावा.

क. सदर फलकामध्ये पुढील सूचना इंग्रजी अथवा स्थानिक भाषेत इमारतीमध्ये व आवारात नमूद कराव्यात " सिगारेट अथवा तंबाखूजन्य उपादने वापरण्यास मनाई/बंदी आहे, असे आढळल्यास रु. २००/- इतका दंड आकारण्यात येईल".

ड. सदर फलकाच्या खालील बाजूस ज्या अधिका-याकडे तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाची जबाबदारी दिली आहे त्याचे नाव, पदनाम व दूरध्वनी क्रमांक छापण्यात यावा. (चित्र क्र.१)

इ. तंबाखू नियंत्रण कार्यक्रम राबविण्यासाठी खाजगी कार्यालये, उपहार गृहे, शाळा/महाविद्यालये त्यांनी त्यांचे कार्यालयातील जबाबदार व्यक्तीची यासाठी नेमणूक करावी.

चित्र क्र. १




६. सिगारेट आणि तंबाखूजन्य उपादने कायदा २००३ चे उल्लंघन झालेले आढळल्यास राजपत्रित अधिकारी किंवा त्यांनी नियुक्त केलेल्या अधिकारी/कर्मचारी यांनी दंडात्मक कार्यवाही करून उल्लंघन करणाऱ्यास दंडपावती देतील व दंडाची रक्कम जमा करून घेतील. (पावतीचा नमुना परिशिष्ट -१ मध्ये जोडला आहे.)

जमा झालेली रक्कम महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: तंबाखू २०१३/प्र.क्र.२५३/आ-५, मंत्रालय मुंबई. दिनांक २ एप्रिल २०१६ अन्वये सांकेतांक: (०२१००६७२०१) या लेखाशीर्षामध्ये जमा करण्यात यावी.

७. सोबतच शासकीय इमारतीच्या सर्व द्वारांवर तंबाखू उत्पादन जमा करण्याकरिता एका पेटीची व्यवस्था असली पाहिजे. जो कोणी तंबाखूचे उत्पादन बाळगत असेल तो सदर पेटीमध्ये तंबाखू उपादने जमा करील अश्या स्पष्ट सूचना दर्शनी भागावर लावण्यात याव्यात. **(चित्र क्र.२ नुसार)**

चित्र क्र. २




**परिशिष्ट . १**

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग

सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने ( जाहिरात मनाई आणि व्यापार व वाणिज्य उत्पादन आणि वितरण नियमन कायदा, २००३ (COTPA)

अंमलबजावणी करणारा विभाग :-------------------------------------
सदरील ठिकाणची दंड पावती ---------------दिनांक -----------------
नाव -----------------------------------------------------------------------------
पत्ता-----------------------------------------------------------------------------

खालील कलमान्वये उल्लंघन करणा-यांना शिक्षा दिली आहे.

- कलम - ४ दंड रक्कम रुपये
- कलम - ५
- कलम - ६ अ
- कलम - ६ ब

- कलम - ७
- इतर अधिनियम --------------कलम------

| | |
|---|---|
| प्राधिकृत अधिका-याचे नाव व पद | प्राधिकृत अधिका-याची सही |

(जमेचे लेखाशीर्ष "०२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य , ०४ - सार्वजनिक आरोग्य, १०४ -फी, दंड इत्यादी, (१) (१०४) तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाखालील सार्वजनिक ठिकाणी धूम्रपानास प्रतिबंध , नियमांनुसार दंड वसुल (संकेतांक - ०२१००६७२०१)

८. या शासन निर्णयान्वये केलेल्या मागदर्शक सूचनांची संपूर्ण राज्यभर प्रभावी अंमलबजावणी करणे हेतू संबंधित विभागाने त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व यंत्रणांना कार्यवाही करावयाच्या सूचना/दक्षता देण्यास निर्देशित करावे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०६३०२२३९०६४६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ASHOK MAROTI ATRAM

Digitally signed by ASHOK MAROTI ATRAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=e212845163abd708717bb4bef92b6886b147679a5af5a494e268689ab8d696dd, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5F7ECA1F400D866EA34324CEA1A547AA04F0DA0794A00BEE126E8678172A15C5, cn=ASHOK MAROTI ATRAM
Date: 2023.07.10 15:42:34 +05'30'

**अशोक आत्राम**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री (सा. आ.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

६. प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव,(गृह) , गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२.सहसचिव (आरोग्य-५), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३.निवडनस्ती (आरोग्य-५)